**भारतासाठी सह्याद्रीचे महत्व**

भारताच्या दृष्टीने सह्याद्री पर्वतांचे आस्तित्व आणि आरोग्य किती महत्वाचे आहे या बद्दल एकूणच आपल्या समाजात दुर्दैवाने पराकोटीचे अज्ञान आढळते. पाहुया त्यासंबंधी काही ठळक मुद्दे...

विंध्य पर्वतांच्या दक्षिणेकडील संपूर्ण भारतीय द्वीपकल्प म्हणजे मध्यप्रदेश आणि छत्तीसगड चे काही भाग, महाराष्ट्र, पूर्वेकडील ओडिशा आणि दक्षिणेकडील सर्व राज्यांची शेती, उद्योग, अर्थकारण, समाजकारण आणि त्यामुळे राजकारण हे बऱ्याच अंशी सह्याद्रीच्या आस्तित्वावर अवलंबून आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

सह्याद्री पर्वतरांगांमुळे दरवर्षी हिंदी महासागरातून येणारा नैऋत्य मान्सून अडतो, आणि घाटमाथ्यावर प्रचंड पाऊस पडतो. अनेक महत्वाच्या नद्यांचा उगम सह्याद्रीमध्ये होतो आणि या नद्या पश्चिमेकडे अरबी समुद्रात किंवा पूर्वेकडे बंगालच्या उपसागरात वाहत जाऊन मिळतात.

पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या (कृष्णा, कोयना, गोदावरी ई) संपूर्ण दक्खनचे पठार ओलांडून बंगालच्या उपसागरात मिळतात. लक्षावधी वर्षांपासून डोंगरातून नद्यांसोबत गाळ खाली येऊन या नद्यांची खोरी अत्यंत सुपीक झाली आणि इथे प्राचीन काळापासून शेतीची उत्तम परंपरा प्रस्थापित झाली आहे. या संपूर्ण भागात पाऊस कधी, किती आणि कुठे पडणार हे सर्व सह्याद्रीच्या असण्यावर ठरले आहे. त्यावर इथली शेती, आहार, समृद्धी, मानवी वस्त्या, उद्योग ई सर्व अवलंबित आहे. अर्थात हा कार्यकारण भाव अजिबात माहित नसल्यामुळे किंवा न कळल्यामुळे बहुतांश लोक निसर्गाला गृहीत धरतायत आणि आता त्याचे परिणाम भोगतायत.

भारताच्या एकूण अर्थव्यवस्थेत द्वीपकल्पाचा वाटा खूप मोठा आणि महत्वाचा आहे. इथे भरपूर औद्योगिकीकरण आणि शहरीकरण झालेले भाग आहेत. फार जुनी आणि मोठी बाजारपेठेची ठिकाणे आहेत. शिवाय अजूनही इथे मोठ्या प्रमाणात शेती होते – ऊस, भात, कापूस, मिरची, नारळ, भुईमुग, विविध फळपिके, मसाल्याचे पदार्थ अश्या शेकडो प्रकारच्या शेतमालासाठी वेगवेगळे भाग प्रसिध्द आहेत. त्यावर आधारित खूप जुने आणि मोठे उद्योग आहेत, उदा. साखर आणि सुती कापड. प्रत्यक्ष सह्याद्री पर्वतांमधून पूर्वापार उंची लाकूड, मसाल्याचे पदार्थ, औषधी वनस्पती आणि मध यांचे उत्पादन, संकलन आणि व्यापार मोठ्या प्रमाणात होत आला आहे.

आज सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर आणि पायाशी कोट्यावधी माणसं आपला चरितार्थ चालवून पोट भरतात, बाजारपेठांमध्ये प्रचंड उलाढाल होत असते, सरकारच्या तिजोरीत भरपूर कर संकलन होत असते, अर्थव्यवस्थेची चक्र फिरत राहतात, पण हे सर्व ज्याच्यामुळे होतं आहे, त्या सह्याद्रीला मात्र आपण पुरते विसरलो आहोत, असे चित्र दिसते.

==========================================================================

**महाराष्ट्र आणि सह्याद्री**

महाराष्ट्राच्या समाजकारण, अर्थकारण आणि राजकारणाच्या जडणघडणीवर सह्याद्रीचा प्रभाव किती थेट आणि सर्वंकष आहे हे समजणे आज फार महत्वाचे झाले आहे.

सह्याद्री अनेक राज्यांमधून पसरला असला, तरी महाराष्ट्रात त्याचं स्थान वेगळंच आहे. खऱ्या अर्थाने सह्याद्रीचे अनन्यसाधारण महत्व प्रथम जाणले ते छत्रपती शिवाजी महाराजांनी. वास्तविक महाराजांचे वाडवडील वेरूळचे भोसले म्हणजे मराठवाड्यातून आलेले. त्यांच्या मातोश्रींचे – जिजाबाईंचे माहेर सिंदखेड राजा – म्हणजे विदर्भाच्या जवळपास. शहाजीराजांना पुण्याची जहागीर मिळाली म्हणून शिवाजीराजांचा जन्म आणि बालपण पुण्यात गेले. इथे त्यांची सह्याद्रीशी ओळख झाली, आणि मुख्य म्हणजे इथल्या डोंगरदऱ्यांचे मूळ रहिवासी, अर्थात मावळ्यांशी ओळख झाली. महाराजांच्या पुढच्या संपूर्ण वाटचालीत याच सह्याद्रीने आणि तिथल्या मावळ्यांनी त्यांना भक्कम साथ दिली.

उत्तरेकडे बलाढ्य मोगल साम्राज्य, दक्षिणेकडे आदिलशाही आणि निजामशाही राज्ये आणि कोकणात ठाण मांडून बसलेले सिद्दी, असा चहूबाजूंनी शत्रूंचा वेढा होता. शिवाय या चौघांच्या पदरी चाकरी करणारे बहुतेक स्थानिक मराठे सरदार कट्टर विरोधक होते, आणि त्यांच्याशी तर रोजचाच संघर्ष होता. या सगळ्याना तोंड देऊन अक्षरशः शून्यातून, कसलेही आर्थिक पाठबळ नसताना, मोठ्या फौजा, हत्तीघोडे, तोफखाने नसताना, मुठभर मावळ्यांना हाताशी घेऊन स्वराज्य उभे करणे हे शक्य झाले ते केवळ आणि केवळ सह्याद्री मुळे. सपाट मैदानी प्रदेशात बलाढ्य सैन्यांसमोर टिकाव लागणं अशक्य आहे हे खूप लवकर उमगल्यामुळे महाराजांनी आपला संपूर्ण प्रवास सह्याद्रीवर स्वार होऊनच पुढे नेला.

सह्याद्रीतल्या छोट्या छोट्या गड किल्ल्यांचा आणि स्थानिक भौगोलिक रचनेच्या सखोल ज्ञानाचा इतका हुशारीने वापर केल्यामुळे खूप कमी संसाधने असूनही महाराजांना तुलनेने खूप मोठा भूभाग जिंकून त्यावर राज्य उभारता आले. सह्याद्री नसता तर महाराष्ट्रात असा इतिहास घडला असता का? छत्रपती शिवरायांचा, मराठेशाही चा अभिमान नाही असा माणूस महाराष्ट्रात एकही असणार नाही. पण ज्याच्यामुळे हे विलक्षण पर्व आपल्या इतिहासात घडलं त्या सह्याद्रीला मात्र आपण पुरते विसरलो आहोत.

या आधीच्या परिच्छेदात म्हणल्याप्रमाणे महाराष्ट्रात होणाऱ्या पावसाचे वाटप, इथल्या मातीची सुपीकता, इथल्या नद्यांचे प्रवाहीपण, इथल्या विविध कृषी हवामान विभागांची जडणघडण – हे सर्व थेट किंवा अप्रत्यक्षपणे सह्याद्री मुळेच घडले, आणि घडते आहे. काही महत्वाचे पैलू पाहू...

- सह्याद्रीत उगम पावणाऱ्या पूर्वगामी नद्यांची सुपीक खोरी आणि नद्यांचे प्रवाहांच्या भरवश्यावर दक्खनच्या पठार प्रदेशात कमी पर्जन्यमान असून देखील हजारो वर्षे उत्कृष्ट शेती होत आली आहे. या नद्यांद्वारे पठारावरील भूजलधारक खडकांचे पुनर्भरण नैसर्गिकरित्या होऊन वर्षभर त्या भूजलावर सर्वांचा चरितार्थ चालत असे.
- गेल्या शतकात सह्याद्री पर्वतरांगांमध्ये आधी इंग्रजांनी आणि मग भारतीय शासनकर्त्यांनी मिळून फक्त महाराष्ट्रात १८०० पेक्षा जास्त मध्यम आणि मोठी धरणे बांधली आहेत. या धरणांचे पाणी कालव्यामधून खाली आले आणि संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र – नगर नाशिक पासून कोल्हापूर पर्यंत – लाभ क्षेत्रात आला. आज तब्बल दोनशे साखर कारखाने महाराष्ट्रात कार्यरत आहेत.
- याच धरणांमधून पाणी साठवून त्याच्या प्रवाहाचा वापर करून वीज निर्मिती सुरु झाली आणि मुंबई शहराचे विद्युतीकरण झाले. शंभर वर्षानंतर देखील आजतागायत हे भले मोठे जलविद्युत प्रकल्प अखंड वीज निर्मिती करतायत.
- याच धरणांच्या पाण्यावर अनेक मोठमोठी शहरे – नाशिक, पुणे, मुंबई, ठाणे, सातारा, कराड, सांगली आणि कोल्हापूर ई. फोफावली आहेत, तिथल्या प्रचंड वाढत्या लोकसंख्या हेच पाणी वापरतायत.
- या शहरांच्या आजूबाजूला विकसित केलेल्या सगळ्या MIDC औद्योगिक वसाहती याच धरणांचे पाणी वापरतात.
- आज सर्व शहरांमध्ये अवाढव्य विकासाची कामे सुरु आहेत. मोठमोठे एक्स्प्रेसवे, उड्डाण पूल, शहरांतर्गत मेट्रो रेल, नवे रेल्वे मार्ग आणि अर्थात अविरत आणि अमर्याद सुरु असलेलं निवासी बांधकाम. या सर्वांसाठी लागणारी खडी आणि वाळू कुठून येते? सह्याद्रीतले डोंगर फोडून, दगडांना क्रशर मध्ये कुटून हे सर्व बनवले जाते.
- आपल्या नकळत ॲल्युमिनियम हा धातू आपल्या दैनंदिन जीवनाचा अक्षरशः अविभाज्य घटक झाला आहे. मोटार वाहनांच्या इंजिनापासून भांडीकुंडी आणि अगदी शेकडो खाद्यपदार्थांचे आणि उत्पादनांचे, अगदी गुटख्यापर्यंत पदार्थांचे पॅकेजिंग – या सर्वांसाठी पावलोपावली आपण ॲल्युमिनियम वापरतो आहोत. यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे बॉक्साईट हे खनिज. याच्या खाणी सह्याद्रीमध्येच आहेत.
- सह्याद्रीच्या दुर्गम डोंगरदऱ्यांमधून रोजगारासाठी फार मोठ्या प्रमाणात युवक पठारावरील शहरांमध्ये स्थलांतर करतात. सैन्य, पोलीस, खाजगी सिक्युरिटी, हॉटेल उद्योग आणि इतर बऱ्याच लहानमोठ्या व्यवसायांना मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ मिळते ते इथूनच.

थोडक्यात – महाराष्ट्रातल्या कोट्यवधी माणसांचे दैनंदिन जगणे, त्यांना रोजगार मिळवून देणारे उद्योग धंदे, त्यांच्यासाठीचा कच्चा माल, शेती, साखर कारखाने – सगळं काही बऱ्यापैकी थेट किंवा अप्रत्यक्षपणे सह्याद्रीतून येणाऱ्या पाण्यावर आणि माणसांवर अवलंबित आहेत.

पण आपण मात्र त्या सह्याद्रीला पुरते विसरलो आहोत. ज्याप्रमाणे एखाद्या घरातील कर्ता पुरुष किंवा स्त्री मान खाली घालून गपचूप आयुष्यभर राबत राहतात, स्वतःची कसलीही पर्वा न करता इतरांना सांभाळतात, आणि सगळे कुटुंबीय मात्र त्यानाच गृहीत धरतात, वापरून घेतात आणि मग विसरून जातात, अगदी तसे.

महाराष्ट्रातील माणसाचा (यात धोरणकर्ते, प्रशासन आणि नागरिक, सगळेच आले) हा कृतघ्नपणा त्याच्या स्वतःच्याच अस्तित्वासाठी धोकादायक का व कसा आहे, हे इथून पुढे जाणून घ्यायचे आहे, पण त्याआधी दोनतीन महत्वाच्या विषयांची थोडी ओळख झाली तर पुढील मंथन जास्त सुकर आणि उपयुक्त होईल.

एकूणच गेल्या दोन शतकांमध्ये औद्योगिकीकरण सुरु झाल्यापासून माणूस निसर्गापासून दूर होत गेला. निसर्गाला गृहीत धरून पूर्णपणे उपेक्षित ठेवून उलट त्याचं ओरबाडून शोषण करणे हे याचेच द्योतक आहे. मानव एकंदरीत इतका स्वकेंद्रित झाला आहे, की इतर सजीव आणि अचल सृष्टी निव्वळ आपल्या उपभोगासाठी आहे एवढच आता त्याला कळतंय.

साहजिकच आहे, वनस्पतींच्या बाबतीत सुद्धा आपण तेच करून दाखवतो आहोत.

(क्रमशः)

लेखक: नरेंद्र खोत

९८२१० ८७११५

संचालक, 'सुहृस्त', पुणे ३०

www.suhasta.net